**<u>ठळक बातम्या</u>**

- माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात सरकारी इतमामाने अंत्यसंस्कार
- राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री आणि भूतान नरेश  यांच्यासह अनेक मान्यवरांची श्रद्धांजली
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमातून साधणार देशवासियांशी संवाद
- २१ वा थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सव १० ते १६  जानेवारी दरम्यान मुंबई आणि ठाणे इथं होणार

**आणि**

- देशाच्या उत्तर भागात थंडीची तीव्र लाट, जम्मू - काश्मीर, लडाख या केंद्रशासित प्रदेशात राष्ट्रीय महामार्गावर बर्फ साचल्यानं दोन्ही बाजूंची वाहतूक बंद

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री आणि जागतिक ख्यातीचे अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंह यांना आज शोकाकुल वातावरणात भावपूर्ण निरोप देण्यात आला. दिल्लीच्या निगम बोध  घाटावर आज त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. शीख धर्मीय संस्कारांनुसार त्यांच्या पार्थिवाला मुखाग्नी देण्यात आला. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभेचे सभापती ओम बिरला, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंग, भूतान नरेश जिगमे खेसर

नामग्येल वांगचुक यांच्या सह अनेक केंद्रीय मंत्री तसेच विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी यांच्यासह अनेक नेते, उच्च पदस्थ अधिकारी, काँग्रेस कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पुष्पचक्र अर्पण केल्यानंतर सैन्यदलाच्या वतीनं शोकधून वाजवून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांना गार्ड ऑफ ऑनर म्हणजेच मानवंदना देण्यात आली. ….

**बाईट- धून…..**

मनमोहन सिंग यांच्या शवपेटीवरचा तिरंगा त्यांच्या कुटुंबियांकडे सुपूर्द करण्यात आला. त्यानतर त्यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी चंदनाच्या चितेवर नेण्यात आलं. यावेळी शीख धर्माच्या प्रथेनुसार  प्रार्थना पठण करण्यात आलं. त्यानंतर **त्यांना** हवेत बंदुकीच्या फैरी झाडून त्यांना मानवंदना देण्यात आली. डॉ. मनमोहन सिंह अमर रहे च्या घोषणांनी यावेळी परिसर दुमदुमून गेला होता.

**<><><><><>**

डॉ मनमोहन सिंग यांचं यथोचित स्मारक बांधण्यासाठी सरकार जागा देऊ करणार असल्याचं केंद्रीय गृह मंत्रालयानं म्हटलं आहे. स्मारकासाठी जागा देण्याची विनंती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी काल सरकारकडे केली होती. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर लगेचच गृहमंत्री अमित शहा यांनी सिंग यांच्या कुटुंबियांशी संवाद साधून त्यांना ही माहिती दिली.

डॉ. मनमोहन सिंह यांचं स्मारक उभारलं जाईल असा निर्णय काल केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला असून काँग्रेस पक्षाला ही माहिती देण्यात आली आहे, असं भाजप खासदार आणि प्रवक्ता सुधांशू त्रिवेदी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आपल्या अमेरिका भेटीत अमेरिकेचे प्रतिनिधी आणि भावी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मायकेल वाल्ट्ज यांची भेट घेतली. या भेटीत उभय नेत्यांमध्ये द्विपक्षीय भागीदारीबरोबरच विविध वैश्विक मुद्द्यांवर विस्तृत चर्चा केल्याची माहिती जयशंकर यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमधून दिली.

**<><><><><>**

टॅक्सी भाड्यात जागा आणि  वेळेनुसार बदल होत असल्याच्या आरोपांची चौकशी करण्याचे आदेश केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिले आहेत. एकाच प्रवासाकरता ॲपल आणि अँड्रॉईड उपकरणांवरुन  बुक केलेल्या टॅक्सीचं भाडं वेगवेगळं आकारलं जात असल्याची तक्रार आल्यावरुन केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण ही चौकशी करणार आहे. अशाच प्रकारे अन्नपदार्थ पोहोचवणाऱ्या सेवा, ऑनलाईन तिकिटं आरक्षण सेवा आणि इतर सेवांसाठीही भाडे आकारणीत फरक केला जात आहे का याचीही चौकशी करण्यात येणार असल्याचं जोशी यांनी समाजामाध्यमावरच्या पोस्टमधे लिहीलं आहे.

**<><><><><>**

इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्था येत्या सोमवारी स्पेडेक्स म्हणजेच अंतराळात दोन यानं परस्परांसोबत जोडण्याचा प्रयोग करणार आहे. अंतराळ राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंग यांनी आज एका मुलाखतीत ही माहिती दिली. इस्त्रोचा हा हा प्रयोग ऐतिहासिक प्रयोग असेल, यामुळे अंतराळात दोन यानं परस्परांशी जोडण्यात प्रभुत्व असलेल्या देशांच्या यादीत भारतही आपल्या नावाची नोंद करणार असल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीच्या मन की बात कार्यक्रमातून उद्या देशो देशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. या मासिक कार्यक्रमाचा हा 117 वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, न्युजऑनएआयआर  ॲप तसंच एअर न्यूज, दूरदर्शन आणि प्रधानमंत्री कार्यालयाच्या युट्युब वाहिनीवरुन हा कार्यक्रम थेट प्रसारित केला जाईल.

**<><><><>**

२१ वा थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सव १० ते १६  जानेवारी या कालावधीत मुंबई आणि ठाणे इथं आयोजित केला जाणार आहे. महोत्सवात ६१ चित्रपटांची निवड झाली आहे. भारतीय चित्रपट विभागात मल्याळम, कन्नड, तेलुगू, बंगाली, आसामी या भाषांमधील अकरा चित्रपटांचा समावेश आहे. महोत्सवात गीतकार जावेद अख्तर यांना ‘आशियाई चित्रपट संस्कृती पुरस्कार’ देण्यात येणार असून पत्रकार रफिक बगदादी यांना ‘सत्यजित राय मेमोरियल पुरस्कार’ देऊन सन्मानित केलं जाणार आहे.

**<><><><>**

दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची आज घोषणाकरण्यात आली. येत्या  १५ ते १९ जानेवारी २०२५ या दरम्यान छत्रपतीसंभाजीनगर इथं हा महोत्सव होणार आहे. या महोत्सवात भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल दिला जाणारा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शिका सई परांजपे यांना जाहीर करण्यात आला आहे.

**<><><><><>**

किंग्ज कप आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खुल्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारताचा आघाडीचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनचा पराभव झाला. उपांत्य फेरीच्या आज झालेल्या सामन्यात चीनच्या हू झेन ॲन यानं त्याला १९-२१,१९-२१ असं पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या मेलबर्न इथं सुरू असलेल्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यात, तिसऱ्या दिवसअखेर भारतानं आपल्या पहिल्या डावात, ९ बाद ३५८ धावा केल्या आहेत. पहिल्या डावात भारत अजूनही ११६ धावांनी पिछाडीवर आहे.

सामन्याच्या आज तिसऱ्या दिवशी नितेश रेड्डी आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी आठव्या गड्यासाठी १२७ धावांची भागिदारी करत, भारताला फॉलोऑनच्या संकटातून बाहेर काढलं.  नितेश रेड्डी यानं आंतरराष्ट्रीय कसोटी कारकिर्दीतलं पहिलं शतक झळकावलं. वॉशिंग्टन सुंदर ५० धावांवर बाद झाला.

<><><><><>

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या धावपट्टीवर उद्या दुपारी 12 वाजता इंडिगो एअरलाईनचं व्यावसायिक विमान  उतरणार आहे. ऑक्टोबर महिन्यात लष्कराचं विमान प्रत्यक्ष धावपट्टीवर उतरलं होतं. तर  हवाई दलाच्या सुखोई 30 विमानानं धावपट्टीवरून काही अंतरावर उड्डाण केलं होतं. त्यानंतर  आता व्यावसायिक विमानाचे लॅडिंग होणार आहे.

<><><><><>

राज्याला कृषी, वीज निर्मिती, उद्योग आणि सेवा क्षेत्रात आणखी पुढे घेऊन जाण्यासाठी सौर ऊर्जेवर भर देण्यात येत आहे. त्यामुळे राज्यातील सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कामांना गती देतानाच त्यात गुणवत्ता राखण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. सह्याद्री अतिथिगृहात  झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

<><><><><>

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी, या मागणीसाठी बीडमध्ये सर्वपक्षीय आणि सर्वधर्मिय मूकमोर्चा काढण्यात आला.  जितेंद्र आव्हाड, छत्रपती संभाजीराजे, मनोज जरांगे पाटील यांच्यासह विविध पक्षांचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि नागरिक या मोर्चात सहभागी झाले होते.

जिल्ह्याचं पालकमंत्री पद आमदार धनंजय मुंडे यांना देऊ नये अशी मागणी छत्रपती संभाजीराजे यांनी केली, तर वेळीच दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी जितेंद्र आव्हाड यांनी केली.

या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई झाली नाही तर राज्यभर हे आंदोलन अधिक तीव्र करायचा इशारा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी यावेळी दिला.

<><><><><>

अफगाणिस्तान आणि पाकिस्तान सीमा दलात सीमेवरील चौक्यांवर झालेल्या चकमकीत १९ पाकिस्तानी सैनिक तर तीन अफगाणी नागरिक ठार झाले.

<><><><><>

देशाच्या उत्तर भागात थंडीची तीव्र लाट असून, डोंगराळ भागात हिमवृष्टी तर सखल भागात पावसाचा जोर आहे. जम्मू - काश्मीर, लडाख या केंद्रशासित प्रदेशात राष्ट्रीय महामार्गावर बर्फ साचल्यानं दोन्ही बाजूंची वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे. श्रीनगर तसंच इतर विविध पर्यटनस्थळांवर पर्यटक हिमवृष्टीचा आनंद लुटताना दिसताहेत. मात्र प्रवास सुरु करण्यापूर्वी रस्ते आणि महामार्गांची स्थिती जाणून घ्यावी अशा सूचना वाहतूक विभागानं दिल्या आहेत.

//<><><><><>//